# रमाबाई रानडे : स्त्री समाजसुधारणांचा प्रेरणास्त्रोत

**अतुल रामदास पोखरकर**
आबासाहेब मराठे कॉलेज, राजापूर
atulramdas@gmail.com

**गोषवारा** :

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले. त्यात महिला वर्ग देखील सोबती होता. भारतीय स्वातंत्र्य लढ्यासोबतच भारतीय समाजातील सुधारणा महत्वाच्या आहेत. महाराष्ट्रात त्यात ही प्रामुख्याने मुंबई प्रांतामध्ये अनेक महिला समाजसुधारक होऊन गेल्या. त्यातील रमाबाई रानडे ह्या एक होत्या. पतीच्या पावलावर पाय ठेवीत त्या सामाजिक सुधारणांसाठी पुढे आल्या. तत्कालीन समाजाचा, स्वकीयांचा रोष पत्करून त्यांनी हे कार्य अविरत ठेवले. सनातनी माहेर व सासर असलेल्या घरात न्या.महादेव गोविंदराव रानडे यांच्यामुळे श्रीमती. रमाबाई रानडे सारखे पुष्प खुलले. त्यांनी पुढे अनेक संस्थामधून स्त्री शिक्षण व सुधारणा घडवून आणल्या. प्रस्तुत लेखात प्रामुख्याने रामबाई रानडे यांचे जीवन चरित्र व स्त्री शिक्षणाचे सामाजिक कार्याचे महत्व मांडण्यात आले आहे.

**प्रस्तावना :**

स्वतंत्र्योत्तर काळात अनेक सुधारणांनी वेग घेतला होता. 1857 च्या उठावा मध्ये भारतीय शिपायांना सहन करावा लागलेला पराभव यामागे अनेक कारणे होती त्यातील एक महत्त्वाचे कारण म्हणजे ब्रिटिश करू पाहत असलेल्या सामाजिक सुधारणांना भारतातील परंपरावादी गटाचा विरोध होता. त्यामुळे 1857 च्या उठावा मध्ये सामाजिक सुधारणा करू पाहणारा पुरोगामी वर्ग सहभागी झाला नाही परिणामी पराभव सहन करावा लागला. परंतु सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक सुधारणा करू पाहणारा वर्ग किती दूरदृष्टी विचारांचा होता, याचा प्रत्यय भारत स्वतंत्र झाल्यानंतर येणाऱ्या काळामध्ये आपल्याला दिसून येतो. ब्रिटिश राजवट सुरू होण्यापूर्वी किंवा सुरू झाल्यानंतरचा एका शतकाचा कार्यकाळ परंपरावादी विचारसरणीच्या लोकांनी अनेक सामाजिक सुधारणांना स्पष्टपणे विरोध केला. ज्यामध्ये महिला शिक्षण, विधवा पुनर्विवाह, सतीबंदी कायदा, बालविवाह बंदी इ. ह्या सर्वांना प्रामुख्याने विरोध झाला. परंतु अनेक भारतीय समाजसुधारक ज्यांनी ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या साहाय्याने समाजातील अनिष्ट रूढी परंपरा दूर केल्या, शिक्षणाची कवाड महिलांसाठी खुली केली, अस्पृश्यांना त्यांचे हक्क मिळवून दिले. ज्यामध्ये महाराष्ट्रात समाज सुधारकांचे अग्रणी म्हणून न्या. महादेव गोविंदराव रानडे यांचे नाव येते. वडिलांच्या दबावामुळे सामाजिक सुधारणा अंतर्गत स्वतः समोर संधी उपलब्ध असतानाही प्रथम पत्नीच्या निधनानंतर एका विधवे बरोबर विवाह करण्याऐवजी त्यांनी एका बालिकेसोबत विवाह केला. ही हळहळ त्यांना वेळोवेळी जाणवते परंतु ज्या पत्नी सोबत त्यांनी विवाह केला तिला मात्र सामाजिक सुधारणांची शिक्षणाची गोडी लावण्यास त्यांनी कोठेच कसूर पडू दिली नाही. न्या. महादेव गोविंदराव रानडे यांच्या पत्नी अर्थात रमाबाई महादेव रानडे यांनी महिला शिक्षणासाठी भरीव योगदान दिले. वडिलोपार्जित पुरुषप्रधान संस्कृतीचा वारसा लाभलेल्या व स्त्री शिक्षण म्हणजे पत्नीला वैधव्य ओढवून घेणे ह्या वैचारिक भट्टीतून तापूल-सलाखून निघालेल्या रमाबाई ह्या अनेक स्त्री समाजसेविकांसाठी आदर्शवत वाटतात.

**परिचय :**

सातारा जवळील देवराष्ट्रे येथील जहागीरदार घराण्यातील अण्णासाहेब कुर्लेकर यांच्या पोटी २५ जानेवारी १८६२ रोजी यमुनाचा जन्म झाला. सुरवातीस घरात अथर्वशीर्ष, व्यंकटेशस्तोत्र वाचनाची व पठणाची परवानगी होती. परंतु वडील आत्या सासरी त्याच्या रोजीच्या व्यंकटेशस्तोत्र पठणामुळे तिला वैधव्य प्राप्त झाले परिणामी आपल्या घरातील महिलांना लिहणे वाचणे धार्जिणे नाही असे म्हणत रमाबाईच्या वडिलांनी शिक्षण बंद केले. अशा घराण्यातील रमाबाईचा विवाह वूधुर असलेल्या रानडे कुतुबातील न्या. महादेव गोविंदराव रानडे यांसारख्या शासकीय सेवेते असलेल्या परंतु सामाजिक कार्याचा वसा घेतलेल्या

एकतीस वर्षाच्या तरुणासोबत दि. ३० नोव्हेंबर १८७३ रोजी विवाह झाला. त्यावेळी यमुना ही अवघ्या एकरा वर्षाची होती. लग्न म्हंटल्यावर मिरवणुका, घोडे, वरती व माणसांची रेलचेल असे यमुनाला वाटले होते परंतु न्या. महादेव गोविंदराव रानडे यांचा हा विधुर विवाह होता. त्यात त्यांना अनपेक्षित व न रुचलेला हा विवाह होता. वडील हट्टामुळे हा त्यांना निर्णय घ्यावा लागत होता. कारण पुण्यात सामाजिक कार्याची घडी बसवताना त्यांनीच पुढाकार घेऊन विधवा विवाह उत्तेजक मंडळी नावाची संस्था त्यांनी १८६५ मध्ये सुरु केली होती. रानडेंच्या अनेक सहकार्यांना असे वाटत होते की रानडे यांनी एखाद्या विधवेसोबत विवाह करावा परंतु वडिलांच्या रोषाला सामोरे जाण्यापेक्षा त्यांनी हा विवाह केला होता त्यामुळे लग्न सरदार घराण्यातील कन्येशी होत असले तरी लग्न अगदी सोप्या पद्धतीत पार पडले.

लग्न होऊन युमना कुर्लेकर नावाऐवजी न्या. महादेव रानडे यांच्या पहिले पत्नीचे नाव म्हणजेच रमाबाई महादेव रानडे हे नाव घेऊन रमाबाई सासरी आल्या. लग्नाच्या पहिल्याच रात्री रमाबाई यांच्या साठी न्या. महादेव रानडे म्हणजेच माधवराव पाटी-पेन्सिल घेऊन आले व श्री गणेशायनमः या आद्य अक्षराने रमाबाईंच्या अक्षर ओळखेला सुरुवात झाली. त्यानंतर च्या प्रत्येक रात्री रमाबाईंच्या रोजच्या दोन तासाच्या कार्यशाळेला सुरुवात झाली. एका बाजूला माहेर जिथे शिक्षण नुसते म्हंटले तरी पाप मानले जाई. प्रत्येक्षात शिक्षण घेणे हा विचार तर सोडाच. आणि एका बाजूला सासर व स्वतः पती जे पुढारलेल्या विचारांचे होते. ज्यामुळे शिक्षणाचा श्री गणेशा झाला.

**रमाबाई रानडे यांचे शिक्षण :**

कोणत्याही समाजसुधारकाला सामाजिक सुधारणा करताना स्वकियांकडून त्रास झाला नाही असे म्हंटले तर नवलच वाटेल. आणि रमाबाई देखील त्याला अपवाद नाहीत. १९ व्या शतकाच्या शेवटीपर्यंत महिलांना शिक्षण घेणे धर्मबहिष्कृत मानले जाईल. शिक्षण हे श्रेष्ठ वर्णातील व्यक्तींनी घ्यावे आणि त्याचा उपयोग महिलांनी फक्त पुराणे, कथा, स्तोत्रे म्हणण्यासाठी करावा लागत असे. असा काळात रमाबाईंना माधवराव इंग्रजी शिक्षण घेऊ पाहत होते. स्वतः त्यांच्या विधवा नणंदा व सासूबाई त्यांना विरोध करत होत्या. परंतु पतीचा शब्द शिरसावंद्य म्हणून त्यांनी शिक्षणाला अडसर येऊ दिला नाही. मराठीत शिक्षण हळूहळू पूर्ण होऊ लागले तोच धाकट्या दिराचा इंग्रजी भाषेतील पहिला इयत्ता पूर्ण होऊन दुसऱ्या इयत्ते बसले होते त्यावेळी मला इंग्रजी शिकायचे आहे, असे त्यांनी स्वतः हून माधवरावांना सुचवले. मुळात रानडे कुटुंब सनातनी विचारांचे होते. तरी देखील अक्षर ओळख आणि शिकवण्या या विषयी स्वतः गोविंदराव रानडे यांना आवड होती. परंतु 'पोथ्या-पुराणे वाचणे व रोजचा हिशोब हातावर करता आले म्हणजे संपले शिक्षण' असा महिलांचा शिक्षकी उपयोग होय. त्यात रमाबाईंचे इंग्रजी शिक्षण म्हणजे घरातूनच विरोध होणार हे नक्की होते. कारण मराठी भाषेत शिक्षण होते तोपर्यंत ठीक होते पण इंग्रजी शिक्षण म्हणजे आत्ता रोजच्या वेळेच्या तुलनेत जास्त वेळ द्यावा लागणार होता. त्यामुळे घरातील बायकांच्या गराड्यातून लवकर आटपून माडीवर अभ्यासासाठी जाणे व नित्यनियमाने घरातील बायकांची बोलणी खाणे हे आत्ता नित्याचे झाले.

रमाबाईंच्या इंग्रजी शिक्षणासाठी माधवरावांनी अनेक प्रयत्न केले होते. रमाबाईंच्या इंग्रजी शिक्षणाची परीक्षा घेण्याची नामी संधी माधवरावांना चालून आली. विल्यम वेडरबर्न या ब्रिटीश अधिकाऱ्याच्या भारताविषयी आस्थेबद्दल त्यांना भारतीय स्त्री शिक्षणासाठी मॅट्रिक पर्यंत शिक्षण देणारी संस्था पुण्यात सुरु करायची होती. यासाठी पुण्यातील हिराबागेत सभेचे आयोजन केले गेले. या सभेला अनेक ब्रिटीश अधिकारी व भारतीय पुढारी वर्ग येणार होता. ज्यामध्ये गव्हर्नर जेम्सफर्गसन यांच्याकडे इंग्रजी निवदेन सादर करायची जबाबदारी रमाबाई यांच्या वर माधवरावांनी दिली. त्यावेळी रमाबाईंना अगदी डोके तापल्या सारखे होऊन घाबरगुंडी उडाली परंतु प्रसंगावधान राखून त्यांनी आपले पहिले इंग्रजी निवदेन रूपी भाषण पूर्ण केले. माधवरावांनी त्याचे कौतुक केले खरे पण घरातील महिलांना मात्र हे आवडले नाही व त्यांनी रमाबाईंची खरडपट्टी सुरु केली. कारण पुरुषांच्या मांडीला मांडी लावून सामाजिक मंचकावर महिलांनी बसण्याची परंपरा त्यावेळी नव्हती. परंतु पुरोगामी माधवरावांच्या विचारांचा पकडा मनावर असणाऱ्या रमाबाईंनी मात्र ही गोष्ट अडसर करू शकली नाही. घराचा होणारा विरोध त्यांनी सहन केला. परंतु त्याची वाच्यता त्यांनी स्वतःचे आत्मचरित्र सोडले तर पती, समाजात इतर कोठे ही केली नाही. आणि आत्मचरित्रात ही स्वतःच्या सासूबाई व नणंदा ह्यांच्या निधनानंतर केला.

**सामजिक कार्यात रमाबाई यांचा चंचूप्रवेश :**

माधवरावांची ब्रिटीश सरकारने नाशिकला बदली केली. परिणामी रमाबाईंना पती सोबत नाशिकला जावे लागले. त्याठिकाणी माधवरावांनी काही निवडक पुढाऱ्यांना एकत्र करून प्रार्थना समाजाची स्थापना केली. त्यानिमित्ताने लोकहितवादी गोपाळ हरि देशमुख यांच्या घरी माधवराव व रमाबाई यांचे येणे-जाणे वाढू लागले. समाजातील सुशिक्षित महिलांना एकत्र घेऊन हळदी-कुंकू कार्यक्रम घ्या, असे माधवरावांनी सुचवले आणि रमाबाईंचा सामाजिक कार्यात प्रवेश झाला. महिलांची वर्दळ रमाबाईंकडे वाढू लागली. माधवरावांची बदली मुंबईला झाली आणि रमाबाई देखील कुटुंब कबिला घेऊन मुंबईत आल्या. त्याठिकाणी त्यांची ओळख पंडिता रमाबाई यांच्या सोबत झाली. त्या दोघींना ही इंग्रजी शिक्षणाची भारी हौस होती. परंतु माधवरावांच्या सतत बदली मुळे व कामाचा व्याप वाढल्यामुळे रमाबाईंच्या शिक्षणात व्यत्यय येत असे त्यामुळे रमाबाईंची इंग्रजीची शिकवणी मिस हरफर्ड यांच्याकडे लावली. पंडिता रमाबाई व रमाबाई दोघी त्यांच्याकडे शिक्षणासाठी जात असत. सनातनी विचारांचा घरात पकडा असल्यामुळे मडम कडे शिक्षण घेतेस म्हणून घरातील स्वयंपाक घरात रामबाईंचा प्रवेश निषध झाला. मॅडम कडून आल्यावर अंगावरील पातळ बदलून स्वच्छ पाण्याने अंघोळ करून त्यांना घरात प्रवेश दिला जाऊ लागला. घरातील अडचणींचा बावू न करता त्यांनी मोठ्या शिताफीने त्याला तोंड दिले.

माधवरावांच्या फिरत्या नोकरीमुळे रमाबाईंना देखील तालुकानिहाय फिराव लागे. प्रत्येक तालुक्यात माधवराव ३-४ दिवस मुक्कामी असे त्यामुळे आसपास गावातील लोक शाळेच्या भेटीसाठी रमाबाईंना बोलवत असले, असाच एक प्रसंग तासगाव मुक्कामी झाला. शाळेच्या बक्षीस समारंभास माधवराव व रमाबाई यांना बोलावले गेले. त्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून रमाबाईंना भाषण करणे आवश्यक होते. रमाबाईंसमोर मोठा प्रसंग उधबवला. परंतु मोठ्या धीराने त्याने हे भाषण पूर्ण केले आणि माधवरावांना मात्र रमाबाई यांचा धीटपणा जाणवू लागला. ह्या भाषणाचा परिणाम एवढा सकारात्मक झाला की, आसपास गावच्या महिला ह्या रमाबाईंना हळदी-कुंक कार्यक्रमासाठी आपल्या घरी बोलावू लागल्या.

माधवरावांची पुणे बदली झाल्या मुळे सामाजिक कार्यात पुन्हा सक्रीय झाले. सुधारणावादी व परंपरावादी ह्यांच्यात अनेक वेळा शाब्दिक चकमकी होत असत. असाच एक प्रसंग रमाबाई व माधवरावांना सहन करावा लागला. ४ ऑक्टोबर १८९० मध्ये पंचहौद मिशन मध्ये एक समारंभ झाला. ज्यामध्ये अनेक मंडळी व स्त्रिया हजर होत्या. या समारंभात चहा- बिस्कीट देण्यात आले. चहा व बिस्कीट खाणे हे धर्मबहिष्कृत कृत्य मानले जात असे त्यामुळे रानडे दाम्पत्यांनी चहाचा कप स्वीकारला परंतु तो प्राशन केला नाही. परंतु गोपाळराव जोशी यांच्या 'पुणे वैभव' या वर्तमान पत्रात रावबहादूर लोक महारांनी बनवलेले चहा हे पेय्य पिले अशी बातमी दिली व परिणामी पुण्यात ही बातमी वाऱ्यासारखी पसरू लागली. व शुद्धीकरण करावे ह्यासाठी रानडे दाम्पत्यांवर दबाव आणला जाऊ लागला. अनेक दिवस जाऊन ही माधवरावांची व रमाबाईंनी शुद्धीकरणाला होकार दिला नाही. परंतु सामाजिक कार्यात अडसर नको म्हणून त्यांनी शेवटी शुद्धीकरण करून घेतले. या सर्व प्रसंगामुळे रमाबाईंचा धीटपणा वाढत गेला. त्यात वेळोवेळी माधवरावांचे आजारपण यामुळे संयम वाढत गेला.

माधवरावांचे सततची बदली, आजारपण व त्यात रमाबाईंचे आजारपण ह्यामुळे वेळोवेळी यांना सामजिक कार्यात अडसर निर्माण होत असे. संपूर्ण भारत भ्रमण त्यांना माधवरावांसोबत फिरता आले. अनेक सामाजिक प्रश्न प्रत्येक्षात अनुभवता आले. मराठी, इंग्रजी सोबतच बंगाली व इतर भाषांचा त्यांचा परिचय झाला. प्रवास करत करत रमाबाई व माधवराव त्यांचा संसार चालू होता. सूर्याला ग्रहण लागावे तसे रमाबाईंच्या संसाराला ग्रहण लागले. पण हो सूर्याचे ग्रहण काही कालावधीत संपते परंतु हे ग्रहण रमाबाई यांच्या आयुष्याला वेगळ्या वळणावर घेऊन गेले. १६ जानेवारी १९०१ रोजी मुंबई या ठिकाणी न्या. महादेव गोविंदराव रानडे यांचे निधन झाले. आणि रमाबाई यांचा खंदा पाठीराखा हरपला. रानडे कुटुंबातील एकमेव माधवराव सोडले तर रमाबाई यांच्या मागे कोणी उभे राहिले नाही उलट पक्षी त्यांच्या सामाजिक कार्यात वेळोवेळी अडसर कसा निर्माण होईल हाच प्रयत्न सासरच्या मंडळींनी केला.

**रमाबाई रानडे यांचे सामाजिक कार्य :**

माधवरावांच्या अकाली निधनानंतर दुखं सोसण्याशिवाय रमाबाईंकडे दुसरा मार्ग नव्हता. दीड वर्ष रमाबाई यांनी सामाजिक कार्यातून स्वतः ला वेगळ करून घेतल परंतु सामजिक कार्य करणाऱ्या समाजसुधारकांच्या नजरेतून त्या सुटू शकत्या नाही. आनंदीबाई भट यांच्या सहकार्याने रमाबाई यांनी १९०२ मध्ये पुण्यात 'हिंदू लेडीज सोशल क्लब' ची स्थापना केली. अशीच एक संस्था रमाबाईंनी मुंबई मुक्कामी १८९४ मध्ये सुरु केली होती. रमाबाई यांचा क्लब स्थापने मागचा उद्देश स्त्रियांमध्ये ज्ञानाचा प्रसार व्हावा. त्यासाठी कीर्तन, व्याख्याने, प्रवचनेअशा विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जात असे. संसारी व प्रौढ स्त्रियांसाठी दुपारच्या वेळी वर्ग घेऊन त्यांना साक्षर करणे. मराठी सोबतच इंग्रजी भाषेचे शिक्षण त्या माध्यमातून दिले जात असे. त्याच्या या कार्यामुळे मुंबई इलाख्याचे गवर्नर ची पत्नी लेडी नॉर्थकोट ह्या रमाबाई यांच्या भेटीसाठी पुण्यात आल्या. त्या नंतर अनेक ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या पत्नी सोबत प्रत्यक्ष रमाबाई यांचा संपर्क आला.

न्या.रानडे यांच्या वर्षश्राद्धावेळी रमाबाई यांनी आपल्याला नंदादीप लावता आला नाही तरी चालेण पण फक्त त्याची वात जरी पुढ सारली तरी खूप झाले अस म्हणून रानडे यांच्या स्त्री शिक्षणातील भरवी योगदानावर प्रकाश टाकून आपले कार्य अधोरेखित केले. रमाबाई यांनी न्या.रानडे यांच्या नंतर सामाजिक कार्यात स्वतःला एवढे झोकून दिले की, अनेक संस्थाचे अध्यक्ष पद त्यांच्या कडे चालून आले. त्यातील एक म्हणजे भारतीय महिला परिषदेचे अध्यक्ष पद होय. डॉ. भांडारकर यांच्या आग्रहामुळे रमाबाई यांनी हे पद स्वीकारले. ह्या संस्थेचा अध्यक्षीय भार स्वीकारल्यानंतर रमाबाई यांच्या सामाजिक कार्याचा वेग अजून वाढला. ह्याची दखल अगदी तत्कालीन वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडियानेदेखील घेतली. तात्कालिक मुंबई सरकारकडून रमाबाई यांच्याकडे येरवडा येथील तुरुंगाच्या मानदअधीक्षक व्हाल का? अशी विचारणा केली गेली. आणि रमाबाई यांनी त्याला लगेच मान्यता दिली. येरवडा येथील महिला गुन्हेगारांच्या संपर्कात रमाबाई येऊ लागल्या. सुरुवातीला त्या महिलांचा विश्वास संपादन करण्यात काही काळ गेला. तुरुंगातील फेऱ्या वाढू लागल्या आणि रमाबाई यांच्यावर त्या महिलांचा विश्वास बसला. रमाबाई यांनी येरवडा येथे गुन्हेगार महिलांचा वर्ग सुरु केला.

**सेवासदन संस्थेची स्थापना :**

१९०४ मुंबई येथे भरलेल्या आद्या महिला परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात रमाबाई यांनी भारतीय स्त्रियांनी युरोपियन देशात निस्वार्थी भावनेने काम करणाऱ्या सिस्टर्सप्रमाणे आपण काम करायला हवे असा सूचित केले. रमाबाई यांच्या ह्या विचारांकडे बेहेरामजी मलबारी व दयाराम गिडुमाल या सुधारकांचे लक्ष वेधले गेले व मुंबई येथे "सेवासदन उर्फ सिस्टर्स ऑफ इंडिया" या संस्थेची उभारणी केली. या संस्थेचे स्वरूप व कार्यपद्धती कशी असावी ह्यासाठी या साठी रमाबाई यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरवण्यात आली. संस्थेचे सल्लागार समिती अध्यक्ष पद रमाबाई यांच्याकडे आले. समितीच्या सदस्या विविध धर्म, जाती समूहाच्या होत्या. स्त्री-जीवन विकासाच्या दृष्टीने ग्रंथालय, वाचनालय, प्रार्थनागृह, शिक्षणवर्ग, वसतिगृह,मोफत दवाखाने, शिवणकामाचे वर्ग सुरु करण्यात आले.

मुंबई याठिकाणी संस्थेचा वाढत चाललेला विस्तार व स्त्रियांचा मिळणारा पाठींबा ह्यामुळे थोड्याच अवधीत संस्थेला बहर येऊ लागला. मुंबईचा संस्थेचा विकासाचा चढता आलेख लक्षात घेऊन रमाबाई यांनी पुण्यात देखील सेवासदन संस्थेची उभारणी करावी असे संस्थेचे जनरल सेक्रेटरी दयाराम गिडुमाल यांना वाटू लागले व त्यांनी तशी विचारणा देखील केली परंतु मुंबई एवढा प्रतिसाद पुण्यात मुळेल का ह्या विषयी शशांक असणाऱ्या रमाबाई यांनी टप्याटप्याने पुण्यात महिलांसोबत अनेक महिने बैठका घेऊन सुरवातीला हिंदू लेडीज सोशल क्लब स्थापून सुरुवात केली. नंतर हळूहळू याचे रूपांतरण सेवासदन संस्थेत केले. पुण्यातील सेवासदन संस्था उभी करताना तिचा संपूर्ण कारभार मुंबई सेवासदन संस्थेपासून स्वतंत्र असला पाहिजे हा आग्रह रमाबाई यांनी धरला. स्त्री शिक्षण व सेवाभावी विचारांचे महत्व पटवून २ ऑक्टोबर १९०९ रोजी पुणे सेवासदन संस्थेची रीतसर इमारत फळाला आली. या संस्थेच्या शिक्षणक्रमात शारीरिक शिक्षण, आरोग्य या विषयांचा अंतर्भाव करण्यात आला. कलाकुसरीच्या वस्तू तयार करणे, शिवण काम करणे असे विषय घेऊन त्यासाठी स्वतंत्र शिक्षक नियुक्त केले.

१९ व्या शतकात स्त्री शिक्षणात अनेक बदल झाले परंतु बाळंतपण कालावधी मध्ये नवजात बालकाला जन्म देताना त्यांचे निधन होत असे. कारण बाळंतपण करण्यासाठी त्यांची जुनीच पद्धत ते वापरत असे. आणि पुरुष डॉक्टर कडे बाळंतपण

करणे त्यांना अडचणीचे वाटत असे. त्यामुळे जर बाळाला जन्म देताना ती भगिनी वाचली तर तो तिचा पुनर्जन्म मानला जाई. अशा अस्वस्थेत बाळंतपण करण्यासाठी स्वतंत्र महिला परिचारिका असायला हव्या असे रमाबाई यांना वाटू लागले. त्यांनी पुणे सेवासदन च्या माध्यामातून पुण्यातील ससून रुग्णालयातील सिव्हील सर्जन कर्नल स्मिथ यांच्याशी चर्चा करून प्रसूतिशास्त्र व रुग्णपरिचारिका अभ्यासक्रमाची सुरुवात करून घेतली. मथुराबाई गोगटे व कृष्णाबाई जठार यांनी मोठे धैर्य दाखवून अभ्यासक्रमासाठी तयार झाल्या. कारण रुग्णालयात परपुरुषाला स्पर्श करणे, त्याच्या पुढे उभे राहणे हे महिलांसाठी दिव्य पेल्यासारखे असे. स्वतः रमाबाई यांनी सर्वप्रथम ससून रुग्णालयातील पुरुषांची सुश्रुषा करून आपल्या पित्याची किंवा पुत्राची आपण सुश्रुषा करत नाही का? मग तसेच समजून आपण ती सेवा करावी असे इतरांना सुचवले. या अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या स्त्रिया ह्या रुग्णालयातील अनेक जाती-धर्मांच्या पुरुषांना स्पर्श करत असे त्यामुळे समाज त्यांना राहण्यासाठी जागा देंत नसे अशांना रमाबाईंनी आपला रानडे वाडा खुला करून दिला. स्त्रियांचा शैक्षणिक प्रगतीचा आलेख पाहून शिक्षण खात्याने तीन वर्षीय सर्टिफिकेट कोर्स सुरु केला. सेवासदन च्या माध्यमातून रमाबाईंनी फॅन्सीफेअर म्हणजेच आनंदमेळा भरवला. ज्यामध्ये सेवासदन मधील स्त्रियांनी बनवलेल्या वस्तूंची विक्री केली जाऊ लागली. त्यातून ही मोठ्याप्रमाणात निधी उभारण्याचे काम रमाबाई यांनी केले.

सेवासदन ही संस्था जरी संकल्पना बेहेरामजी मलबारी व दयाराम गिडुमाल यांची असली तरी पुणे सेवासदन संस्था, पुणे रमाबाईंनी मोठ्या हिमतीने उभी केली. संस्था उभारणीसाठीचे अपार कष्ट, शारीरिक मेहनत, मानसिक व संपत्तीक कष्ट व झीज रमाबाईयांनी सहन केली. पुणे म्युन्सिपाल्टीमध्ये पटेल अ‍ॅक्ट नुसार असावा स्त्रियांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे. अशी बाजू रमाबाई यांनी मांडली. स्त्रियांच्या शिक्षणासाठी लढणाऱ्या, स्त्री हक्कासाठी वाचा फोडणाऱ्या श्रीमती.रमाबाई महादेवराव रानडे यांचे २६ एप्रिल १९२४ रोजी पुणे येथे निधन झाले. जिवंतपणी महिलांसाठी सामजिक कार्य करून जुन्या धार्मिक चौकटी मोडणाऱ्या रमाबाई यांच्या अंतयात्रेत अनेक महिलांनी सहभाग घेऊन अगदी स्मशानभूमीपर्यंत सहभागी झाल्या. तत्कालीन समाजात स्त्रियांनी प्रेतासोबत स्मशानभुमीत जाणे निषिद्ध होते. परंतु स्त्रियांना सामजिक चळवळीत सक्रिय करणाऱ्या रमाबाईंच्या अंतयात्रेने ती सामजिक व धार्मिक चौकट मोडली.

**समारोप :**

एकविसाव्या काळात महिलांच्या विविध प्रश्नांवर प्रकटपणे बोलणे शक्य होत नाही परंतु एकोणिसाव्या विसाव्या शतकात महिलांच्या हक्क, शिक्षणासाठी रमाबाईंनी लढा दिला. तत्कालीन समाजाचा रोष पत्कारून त्यांनी स्त्री सुधारणावादी चळवळ चालू ठेवली. रमाबाई यांच्या लग्नापूर्वीच माधवराव सामाजिक कार्यात सक्रीय होते. हाच वसा व वारसा रमाबाई यांनी घेतला व आयुष्यभर त्याशी प्रमाणिक राहिल्या. माधवरावांनी दिलेल्या प्रत्येक संधीला रमाबाई यांनी न्याय दिला. माधवरावांच्या निधनानंतर हाच वेग दुपटीने वाढला. व पतीचे कार्य हे ईश्वरी कार्य समजून त्यांनी मरे पर्यंत अविरत त्याची साथ सोडली नाही. समाज कार्य करताना आलेले अनेक कौटुंबिक कलह, दुख हे कधीच रमाबाई यांनी आड येऊ दिले नाही, मग अगदी मानस पुत्राकरवी रानडे वाड्यातून त्यांना काढून लावले गेले. तरी ही त्यांनी आपले लक्ष ढळू न देता कार्यमग्न राहिल्या. पुणे सेवासदन संस्थेच्या आज महाराष्ट्रभर अनेक शाखा आहे त्याचे योगदान रमाबाई यांनाच जाते. त्यामुळे १९ व्या व २० व्या शतकातील महिला समाजसुधारक म्हणून रमाबाई यांचे नाव महत्वाचे आहे. तसेच पहिल्या महिला आत्मचरित्रकार म्हणून देखील त्यांचे नाव प्रथम स्थानी आहे.

**संदर्भ :**

१. मधुवंती सप्रे, ध्यासपर्व, मेहता पब्लिकेशन्स हाऊस, २०२२
२. माधव श्रीनिवास विद्वांस, श्रीमती रमाबाई रानडे – व्यक्ती आणि कार्य, मॅजेस्टिक प्रकाशन
३. रविप्रकाश कुळकर्णी, रमाबाई रानडे यांचे चरित्र, वरदा प्रकाशन, पुणे
४. श्रीमती रमाबाई रानडे, आमच्या आयुष्यातील काही आठवणी, तृतीय आवृत्ती, वरदा प्रकाशन, पुणे – २०१२